नि. दि. दा. क्र. ६३७/२०२२
पोपट भोसले व एक वि. किशोर दगडे व एक
MHSO110024632022

## निशाणी क्र.१० खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला विना कैफियतीचा आदेश व विना म्हणणेचा आदेश रद्द होऊन मिळण्याकरीता केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ याचे अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की,वादी यांनी प्रतिवादींविरुध्द जाहीर ठरावासाठी व निरंतर ताकीदीसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ यांना दाव्यासंबंधीची कागदपत्रे महसूल खात्याकडून उशिरा मिळाल्याने त्यांना कैफीयत व निशाणी ५ चे अर्जास म्हणणे दाखल करण्यास विलंब झालेला आहे. प्रतिवादी क्र.१ यांना दिनांक १०.१०.२०२२ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी वेळेत म्हणणे व कैफीयत दाखल केली नसल्याने त्यांचे विरुध्द दिनांक ०४/०७/२०२३ रोजी विना कैफीयतीचा आदेश झालेला आहे. प्रतिवादीस म्हणणे व कैफीयत दाखल करण्यास ०६ महिने १० दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा जाणुनबुजून केलेला नाही. प्रतिवादी क्र.१ ची कैफीयत व म्हणणे स्विकारल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. दाव्याचा गुणवत्तेवर निकाल होणेकरीता प्रतिवादी क्र.१ ला संधी देऊन म्हणणे व कैफीयत स्विकारण्याची विनंती केली आहे.

०३. वादीने प्रस्तुत अर्जाच्या मलपृष्ठावर आपले म्हणणे दाखल केले आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, सदरचा अर्ज योग्य व कायदेशीर नाही. प्रतिवादीने जाणुनबुजून जाणीवपूर्वक उशीराने वादीस त्रास होणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. दावा मिळकतीत प्रतिवादीचा कोणताही संबंध नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती

केली आहे व यदाकदाचित सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे या मतास मा.न्यायालय आल्यास प्रतिवादीस जास्तीत जास्त दंड करण्यात यावी व दंडाची रक्कम वादीस देणेत यावी अशी विनंती केली आहे.

०४. अर्ज, म्हणणे, दावा व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने जाहीर ठरावासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. दाव्याचा व तुर्तातूर्त मनाई अर्जाचा गुणदोषावर अंतिमरित्या निकाल होण्यासाठी प्रस्तुत प्रतिवादीची कैफियत व म्हणणे अभिलेखावर असणे आवश्यक आहे. अर्जातील मजकुराबाबत प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.११ दाखल केला आहे. त्यामुळे या प्रतिवादीला त्याचा बचाव दाव्याच्या गुणदोषावर निकाल होण्यासाठी दाखल करण्याची परवानगी देणे उचित आहे. अर्ज मंजूर केलेस वादीचे नुकसान होणार नाही. मात्र नामंजूर केलेस या प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

०१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ याच्या विरुध्द झालेला विना कैफियत व विना म्हणणे आदेश रद्द करण्यात येतो आणि प्रतिवादी क्र.१ चे म्हणणे व कैफियत वाचून नोंदविण्यात येत आहे.

०३. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

Digitally signed by MAHESH NARAYAN PATIL
Date: 2024.02.20 16:48:16 +0530

( एम.एन.पाटील )

दिनांकः– २०/०२/२०२४

४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
माळशिरस.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment / Order.

| | | |
|---|---|---|
| Court | : | 4rd Jt. C. J. J. D. & J. M. F. C. Malshiras |
| Name of Stenographer | : | S.S.Mitragotri |
| Date of Order/Judgment | : | 20/02/2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 20/02/2024 |
| Judgment/Order uploaded on | : | 20/02/2024 |